# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.


25 वर्ष विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र.मनपा/आस्था/ ११ २१ /2026-27 दि. ०५ / ०१ /2026

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका पशुसंवर्धन विभागाकरीता ठोक मानधनावर पशुधन पर्यवेक्षक या पदाची जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागासाठी पुनम सागर, अय्यपा मंदिराजवळ, मिरारोड (पूर्व) येथे आजारी पशुपक्ष्यांवर प्राथमिक उपचार ठोक मानधनावर पशुधन पर्यवेक्षक हे पद थेट मुलाखतीद्वारे भरणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाकरीता ठोक मानधनावर पशुधन पर्यवेक्षक घेण्याबाबत जाहिर सूचना केलेली आहे.

सदरची जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत- जाहिर सुचनेची प्रत

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

25 वर्षे विकासाची

जा.क्र./मनपा/आस्था/ ११२/2026-27 दि. ०४/०१/२०२६

**मिरा भाईंदर महानगरपालिका पशुसंवर्धन विभागासाठी ठोक मानधनावर पशुधन पर्यवेक्षक या पदाची थेट मुलाखत (Walk In Selection)**

## जाहीर सूचना

मा.आयुक्त तथा प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागासाठी पुनम सागर, अय्यपा मंदिराजवळ, मिरारोड (पूर्व) येथे आजारी पशुपक्ष्यांवर प्राथमिक उपचार ठोक मानधनावर पशुधन पर्यवेक्षक हे पद थेट मुलाखतीद्वारे (Walk In Selection) भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणेची विनंती करीत आहेत. पशुधन पर्यवेक्षक (ठोक मानधन) या पदापुढे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक संच व मूळ प्रमाणपत्रांसह दि. १४ / ०१ /2026 रोजी सकाळी 10.00 ते 1.00 या कालावधीत मा.स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प), जि.ठाणे- 401 101 येथे मुलाखतीकरीता उपस्थित राहावे.

➢ **पशुधन पर्यवेक्षक (ठोक मानधन) यांची शैक्षणिक पात्रता/अर्हता -**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या | मासिक ठोक मानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | पशुधन पर्यवेक्षक | 1. महाराष्ट्र राज्य माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यामिक शांलात प्रमाणपत्र परिक्षा(H.S.C.)<br>2. मान्यता प्राप्त विद्यापिठाची पशुसंवर्धनाची पदवीका उत्तीर्ण<br>3. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | 02 | रु.30,000/- |

**विशेष सुचना :-**

1) सदर जाहिरात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**1. वयोमर्यादाः-**

1.1 किमान वयोमर्यादा 18 वर्ष पूर्ण व कमाल 38 वर्ष, मागासवर्गीय उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा 43 वर्ष राहील.

**2. पद भरती गुणांकनाची विस्तृत कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील-**

2.1 जाहिरातीत नमूद पदांवर उमेदवारांची थेट मुलाखत (Walk in Selection) पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल. उमेदवारास 100 पैकी गुण देण्यात येतील.

Scanned with OKEN Scanner

2.2 निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

2.3 निवड यादी गुणानुक्रमे प्रसिध्द करण्यात येत असल्याने निवड झालेल्या उमेदवारा व्यतिरिक्त इतर सर्व उमेदवार प्रतिक्षा यादीत राहतील.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

Scanned with OKEN Scanner